सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : १४१ | बुधवार, दि. ११ फेब्रुवारी २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

# राज्यातील बेरोजगार तरुणांना मोठी लॉटरी

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची मोठी घोषणा; ७० हजारांहून अधिक पदांची होणार भरती

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

राज्यात लवकरच नोकर भरती प्रक्रिया नव्या पद्धतीने राबवली जाणार आहे. सुमारे ७० हजारांहून अधिक पदांची भरती टप्प्याटप्प्याने केली जाणार आहे. यामध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून सुमारे २० हजार पदे आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगाबाहेरील पदांचा समावेश असणार आहे. भरती प्रक्रिया राबविताना आवश्यक कौशल्ये, सेवा प्रवेश, पात्रता आणि कामाच्या स्वरूपानुसार निर्णय घेण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत.



मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे सेवा प्रवेश नियमावली सुधारणेसंदर्भात बैठक झाली. या बैठकीस मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह प्रशासनातील सर्व अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव तसेच सचिव उपस्थित होते. राज्य प्रशासनातील महत्त्वाच्या विभागांकडे सर्वांगीण प्रशासन सुधारणा वेगाने राबवाव्यात याव्यात. मनुष्यबळ व्यवस्थापन आणि भरती प्रक्रियेतील पारदर्शकता याला प्राधान्य असेल. राज्य शासनाच्या सेवा प्रवेश नियमावली सुधारणेसंदर्भातील निर्णय लवकरच मंत्रिमंडळ बैठकीत घेतला जाणार असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, की सामान्य प्रशासन विभाग हा केवळ औपचारिक नाही, तर शासनाच्या संपूर्ण भरती प्रणालीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. राज्य शासनाच्या विविध विभागात ७० हजार पदे भरल्यानंतर विभागाच्या कार्यक्षमतेत भर पडणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत मुख्यमंत्र्यांच्या परिषदेत महाराष्ट्र शासनाने मांडलेले मनुष्यबळ व्यवस्थापन मॉडेल सर्वाधिक प्रशंसनीय ठरले. त्यावेळी प्रधानमंत्री मोदी यांनी इतर राज्यांनाही हे सुधारणा मॉडेल स्वीकारण्याचे निर्देश दिले. यामुळे महाराष्ट्र प्रशासन सुधारणा क्षेत्रात देशासाठी मार्गदर्शक ठरले आहे.

भरती प्रक्रियेत अनावश्यक कागदपत्रे, लांब रांगा आणि विलंब टाळण्यासाठी ऑनलाईन व डिजिटल व्हेरिफिकेशन मॉडेल विकसित करण्यावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी भर देण्याच्या सूचना केल्या आहेत. पासपोर्टसारख्या संवेदनशील दस्तऐवजांची ऑनलाईन पडताळणी शक्य असल्यास, इतर प्रक्रियांमध्येही हे मॉडेल वापरता येईल. यासाठी प्रत्येक विभागाने ब्लॉकचेन पद्धतीबरोबरच डीजीलॉकर प्रणालीत प्रमाणपत्रे उपलब्ध करून देण्यासाठी योग्य ती व्यवस्था करावी. भरती प्रक्रियेत कोणताही संशय, पक्षपात किंवा अन्याय होऊ नये, यासाठी संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक आणि विश्वासार्ह असावी. त्याचबरोबर युवकांच्या मनात शंका राहू नयेत, यासाठी प्रणाली स्वच्छ आणि वेगवान असणे गरजेचे आहे. येणाऱ्या एका वर्षात महाराष्ट्रात गव्हर्नन्स रिफॉर्मचे नवे मॉडेल उभे राहील. यात प्रत्येक विभागाची भूमिका महत्त्वाची आहे. यासाठी कोणत्याही विभागाने मागे न राहता सर्वांनी एकत्र येऊन प्रशासन सुधारणा यशस्वी कराव्यात, असेही यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटले आहे.



अमळनेर : एन. टी. मुंदडा शाळेत बंदोबस्ताला उपस्थित पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम, पोलीस कर्मचारी व गृहरक्षक दलाचे जवान.

(छायाचित्र : रजनीकांत पाटील)

# बोर्डाच्या परीक्षा केंद्रांवर 'सीसीटीव्ही'ची करडी नजर

## कडक पोलीस बंदोबस्तात झाला इंग्रजीचा पहिला पेपर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : बारावी बोर्डाच्या परीक्षेला मंगळवार, दि. १० फेब्रुवारी रोजी सुरूवात झाली आहे. पहिला पेपर इंग्रजी विषयाचा कडक बंदोबस्तात झाला. कॉपीबहाद्दरांवर आळा घालण्यासाठी यंदा परीक्षा केंद्रांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आले आहे.

प्रत्येक केंद्रावर सीसीटीव्ही यंत्रणा, बैठी पथके, फिरते पथक, ड्रोन कॅमेऱ्याद्वारे तसेच व्हिडिओग्राफीद्वारे बारीक नजर ठेवली जात आहे. मात्र, परीक्षा केंद्राबाहेर मोठ्या प्रमाणात पालकांची मोठी गर्दी दिसून येते. परीक्षा केंद्रांजवळ मोठ्या प्रमाणात वाहने लावण्यात आलेली दिसून आली. यावर पोलिसांनी कारवाई करण्याची मागणी सूज्ञ पालकांनी केली आहे.

काही विद्यार्थ्यांचे पालक पेपर सुटल्यानंतर घरी घेऊन जाण्यासाठी थांबून होते. शिक्षण विभाग व प्रशासनाकडून परीक्षा केंद्र परिसरात १०० मीटरपर्यंत जमावबंदीचे नियम लागू आहेत. मात्र, त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी होताना दिसून येत नाही.

### ३५ विद्यार्थी गैरहजर

शहरासह तालुक्यात पाच केंद्रांवर एकूण ३ हजार ५५४ परीक्षार्थींपैकी ३ हजार ५१९ परीक्षार्थी इंग्रजीच्या पहिल्या पेपरला प्रविष्ट होते. ३५ विद्यार्थी हे गैरहजर होते, अशी माहिती गटशिक्षणाधिकारी प्रमोद पाटील यांनी दिली.

# श्री मंगळ ग्रह मंदिरात गुरुवारी सामूहिक पारायण







**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील श्री मंगळ ग्रह मंदिरात गुरुवार, दि. १२ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी सहा वाजेपासून ते दुपारी चार वाजेपर्यंत सामूहिक पारायण होणार आहे. श्री मंगळ ग्रह मंदिर येथे विश्वात कोठेही नसलेली अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण श्री स्वामी समर्थांची अलौकिक प्रतिमा आहे. तसेच विश्वातील एक मात्र कमंडलूस्थित श्री गुरुदत्त व श्री अनघा लक्ष्मी मातेचे मंदिर आहे. या पार्श्वभूमीवर या वर्षापासून मंदिर व्यवस्थापनाने दरवर्षी सामूहिक पारायणाचा कार्यक्रम घेण्याचे सुनिश्चित केले आहे. पारायणासाठी येणाऱ्या सर्व भाविकांसाठी नाष्ता व भोजन महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. पारायणाला येणाऱ्या भाविकांनी सोबत आसन, गुरुचरित्र ग्रंथ, माळ व पाण्याची बाटली आणावी. पारायणासाठी नाव नोंदणी करण्याची गरज नाही. जास्तीत जास्त भाविकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे मंगळ ग्रह सेवा संस्थेतर्फे कळविण्यात आले आहे.

# एसटीच्या ताफ्यात दाखल होणार 'राजमाता जिजाऊ' बस

## परिवहन मंत्री ना. प्रताप सरनाईक : नव्या बसमध्ये ५५ प्रवाशांना बसण्याची सोय

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

महाराष्ट्राच्या वैभवशाली इतिहासाला आधुनिकतेची जोड देत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) ताफ्यात लवकरच नव्या दमाच्या बसेस दाखल होत आहेत. गर्दीच्या मार्गावर प्रवाशांना उभे राहून प्रवास करावा लागू नये, यासाठी ३ बाय २ आसन रचनेच्या तब्बल ५५ आसनी अत्याधुनिक बस खरेदी करण्यात आल्या आहेत. या नव्या बस गाड्यांना हिंदवी स्वराज्याच्या जननी राजमाता जिजाऊ यांचे नाव देण्यात आले असल्याची माहिती राज्याचे परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष ना. प्रताप सरनाईक यांनी दिली.

या बस मार्च महिन्यापासून टप्प्याटप्प्याने राज्यभर प्रवाशांच्या सेवेत दाखल होणार आहेत. भगव्या आणि शुभ्र पांढऱ्या रंगसंगतीत सजलेल्या या बस महाराष्ट्राच्या परंपरेचे आणि अभिमानाचे जणू चालते-बोलते प्रतीक ठरणार आहेत.

### इतिहासाचा सन्मान, प्रवासात आराम

मंत्री सरनाईक म्हणाले, की छत्रपती शिवाजी महाराज हे संपूर्ण महाराष्ट्राचे दैवत आहेत. त्यांच्या स्वराज्य संकल्पनेमागे उभी राहिलेली प्रेरणाशक्ती म्हणजे राजमाता जिजाऊ साहेब ! त्या अर्थाने त्या हिंदवी स्वराज्याच्या जननी ठरतात. म्हणून त्यांच्या स्मरणार्थ एसटीच्या नवीन बस गाड्यांना राजमाता जिजाऊ असे नामकरण केले आहे. अर्थात, एसटीने यापूर्वी शिवनेरी, शिवशाही, शिवाई, यशवंती, हिरकणी अशा नावांनी बसला यापूर्वी गौरवले आहे. आता त्या परंपरेत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. अधिक आसन क्षमता, प्रवाशांना मोठा दिलासा सध्याच्या बसची आसन क्षमता साधारण ४० प्रवासी इतकी असताना, नव्या बसमध्ये ५५ प्रवासी आरामात बसू शकतील. म्हणजेच गर्दीच्या मार्गावर उभे राहणाऱ्या तब्बल १५ प्रवाशांना आता बसण्याची सोय उपलब्ध होणार आहे. त्यामुळे ही सेवा विशेषतः दोन शहरांदरम्यानच्या अतिगर्दीच्या मार्गावर सुरू करण्याचा एसटीचा मानस आहे. "राजमाता जिजाऊ" हे नाव केवळ नामकरण नाही, तर स्वराज्याच्या संस्कारांचा, मातृशक्तीच्या प्रेरणेचा आणि प्रवाशांच्या सोयीसाठीच्या बांधिलकीचे एक सन्मानचिन्ह आहे. लवकरच इतिहासाच्या साक्षीने सजलेल्या या बस आधुनिक सुविधांसह महाराष्ट्राच्या रस्त्यांवर धावतील, असेही मंत्री ना. सरनाईक यांनी सांगितले.




## आजचे अभीष्टचिंतन



**श्री. भास्कर अण्णा पाटील**
पुणे



**श्री. आयुष जोशी**



**श्री. भालचंद्र राजपूत**
हिंदू जनजागृती समिती



**श्री. निखिल दहिवदकर**
न्यायालय, अमळनेर.

## दिनविशेष
११ फेब्रुवारी

- विज्ञानातील महिलांचा आंतरराष्ट्रीय दिवस
- पंतप्रधान मोरारजी देसाई यांनी अंदमान आणि निकोबार बेटांमधील सेल्युलर जेलला राष्ट्रीय स्मारक म्हणून घोषित केले.
- प्लूटोने नेपच्यूनची कक्षा ओलांडली, २२३१ पर्यंत प्लूटो पुन्हा नेपच्यूनच्या कक्षेत प्रवेश करणार नाही

## गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!

**भारत- पाकिस्तान मॅचचा धडकी भरवणारा जाहिरातीचा दर**
(पान ३ वर...)

## संपादकीय

# आंतर पोटजाती विवाह : जातीनिर्मूलनाची खरी सुरूवात

भारतीय समाजातील जातीव्यवस्थेच्या निर्मूलनाविषयी चर्चा, भाषणे, लेखन आणि ठराव यांची परंपरा दीर्घकाळापासून सुरू आहे. आपण सर्वजण सार्वजनिक व्यासपीठांवर जातीव्यवस्था नष्ट झाली पाहिजे, असे ठामपणे मांडतो. मात्र हीच भूमिका जेव्हा स्वतःच्या घराच्या उंबरठ्याशी येते तेव्हा समाज अजूनही गडबडतो, कचरतो आणि मागे सरकतो, हीच आजची खरी शोकांतिका आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९३६ साली लिहिलेल्या 'जातीव्यवस्थेचे निर्मूलन' या ऐतिहासिक ग्रंथात जातीव्यवस्था नष्ट करण्याचा स्पष्ट आणि निर्भीड मार्ग सांगितला होता. जवळपास नव्वद वर्षे उलटून गेली, तरीही 'जात' आजही जात नाही. म्हणूनच डॉ. बाबासाहेबांचे वाक्य आज अधिकच अर्थपूर्ण वाटते. 'जी जात जात नाही, तिलाच जात म्हणतात.'

आज समाजात रोटी व्यवहार मोठ्या प्रमाणात स्वीकारला गेला आहे. एकेकाळी अस्पृश्य मानल्या गेलेल्या समाजांमध्येही सामाजिक देवाणघेवाण सुरू झाली आहे, ही निश्चितच स्वागतार्ह बाब आहे. मात्र बेटी व्यवहार, म्हणजेच विवाहाच्या माध्यमातून होणारी सामाजिक एकात्मता अजूनही अपवादात्मकच आहे. जातीव्यवस्थेचा खरा किल्ला आजही विवाह संस्थेभोवतीच उभा आहे, हे नाकारता येत नाही. महात्मा जोतिराव फुले यांनी 'एकमय समाजा'चे स्वप्न पाहिले होते जेथे वेगवेगळ्या धर्मांचे, जातींचे लोक एका कुटुंबात नांदतील. मात्र आजही हे स्वप्न वास्तवात उतरण्याऐवजी केवळ चर्चेपुरते मर्यादित राहिले आहे. विशेषतः एकाच समाजातील पोटजातींमध्येही विवाह होत नसणे, हे सामाजिक प्रबोधनाच्या मर्यादांवर प्रश्नचिन्ह उभे करते.

आज बहुतेक समाज अनेक पोटजातींमध्ये विभागलेले आहेत. जर त्या-त्या समाजातील नेते, अधिकारी, शिक्षीत घटक यांनी पुढाकार घेऊन आपल्या मुला-मुलींचे विवाह इतर पोटजातींमध्ये घडवून आणले, तर त्याचा प्रभाव निश्चितच समाजाच्या तळागाळापर्यंत पोहोचू शकतो. समाजातील आदर्श व्यक्तींचे आचरण हेच अनेकदा परिवर्तनाचे बीज ठरते, हे इतिहासाने वारंवार सिद्ध केले आहे. आंतर पोटजाती विवाहांची उदाहरणे आज अस्तित्वात आहेत, मात्र त्यांचे प्रमाण अत्यंत कमी आहे. काळाची गरज ओळखून असे विवाह वाढवणे, ही जातीनिर्मूलनाच्या दिशेने उचललेली निर्णायक पायरी ठरू शकते. त्यामुळे भविष्यात वधू-वर परिचय मेळावे हे एका विशिष्ट पोटजातीपुरते मर्यादित न राहता संपूर्ण समाजासाठी खुले असणे आवश्यक आहे. आज समाज मोठ्या प्रमाणावर शिक्षीत झाला आहे, जाणिवा वाढल्या आहेत; मात्र सुरूवात करण्याची मानसिक तयारी अजूनही अपुरी आहे. अशा वेळी विविध समाजांचे नेते, लोकप्रतिनिधी आणि अधिकारी यांनी पुढाकार घेऊन आंतर पोटजाती विवाहांसाठी मार्ग मोकळा करून देणे, ही केवळ सामाजिक जबाबदारी नाही, तर ऐतिहासिक गरज आहे. जातीव्यवस्थेचे निर्मूलन हे केवळ घोषणांमधून नव्हे, तर प्रत्यक्ष कृतीतून घडते. त्या कृतीची सुरूवात जर आपल्या घरापासून झाली, तर समाज बदलायला फार वेळ लागणार नाही.

# महाराष्ट्रातील सौंदाळा पहिले जातमुक्त गाव..!

## ग्रामपंचायतीचा ऐतिहासिक निर्णय; कोणतीच जात, पंथ, धर्म, वंश मानणार नाहीत...!!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

देशात आणि महाराष्ट्रात जाती- जाती मध्ये माणसे विखुरलेली आहेत. अशातच महाराष्ट्रातील एका गावाने ऐतिहासीक निर्णय घेतला आहे. हे गाव महाराष्ट्रातील पहिले जातमुक्त गाव ठरले आहे. गावोगावी जाती- जाती मधील होणारे ताण- तणाव, शांतता भंग, विनाकारण जातीयतेमुळे होणारे वाद कमी व्हावे आणि मानव अधिकारांचे उल्लंघन होऊ नये, हा मुख्य हेतू ठराव घेण्याचा असल्याचे समजते. अहिल्यानगर जिल्ह्यातील सौंदाळा या ग्रामपंचायतीने हा ऐतिहासिक निर्णय घेतला असून, जातमुक्त गावाची घोषणा केली आहे.




भारतीय संविधानाने सर्व नागरिकांना समानता, स्वातंत्र्य, बंधुता आणि मानवी प्रतिष्ठेचा मूलभूत अधिकार प्रदान केला आहे. तरीही समाजात जातीय भेदभाव, अस्पृश्यता व सामाजिक विषमता आढळून येते. सौंदाळा गावातील नागरिकांनी जाती- भेदभाव या गोष्टीला मुठमाती देऊन स्वातंत्र्य समता बंधुता अंगीकारण्यासाठी सौंदाळा ग्रामसभेत रक्तदान करून गाव प्रमोद झिंझाडे यांच्या आवाहनास प्रतिसाद देऊन "जातमुक्त गाव" घोषित केले, अशी माहिती लोकनियुक्त सरपंच शरदराव आरगडे यांनी दिली

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ अंतर्गत ग्रामसभेला गावाच्या सामाजिक, शैक्षणिक व नैतिक विकासासंबंधी तसेच सार्वजनिक हिताच्या विषयांवर ठराव करण्याचा अधिकार आहे. त्या अधिकाराचा वापर करून ग्रामपातळीवर सामाजिक एकात्मता व समता प्रस्थापित करण्यासाठी आपले गाव "जातमुक्त गाव" म्हणून घोषित करणे अत्यंत आवश्यक आहे, असे मत ग्रामस्थांनीही व्यक्त केले.

### जातमुक्त गावासाठी ग्रामसभेत ठराव मंजूर

सदर ग्रामसभेत निर्णय घेण्यात आला, की मौजे सौंदाळा गावामध्ये जात, पंथ, धर्म, वंश या आधारे कोणताही भेदभाव केला जाणार नाही. गावातील सर्व नागरिक समान आहेत व " माझी जात मानव" ही भावना स्वीकारण्यात येत आहे. सार्वजनिक ठिकाणे, शासकीय योजना, ग्रामपंचायत सेवा, सामाजिक-धार्मिक कार्यक्रम, विवाह, सण-उत्सव आदींमध्ये जातीभेद पूर्णपणे बंद राहील. गावामध्ये कोणतीही जातनिहाय प्रथा, भेदभाव, बहिष्कार, अस्पृश्यता किंवा सामाजिक अन्याय आढळल्यास ग्रामसभा, ग्रामपंचायत त्यावर तत्काळ कारवाई करेल. सौंदळा गाव "जातमुक्त गाव" म्हणून घोषित करण्यात येत आहे. हा ठराव शासनाकडे व संबंधित विभागांकडे नोंदवहीसाठी पाठविण्यात यावा.

# प्रभाग क्रमांक एकमधील दोन कोटींचा कॉंक्रिट रस्ता अर्धवट

## नागरिकांमध्ये संताप; लवकर काम पूर्ण करण्याची मागणी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शासनाच्या विशेष योजनेतून प्रभाग क्रमांक १ मधील मारवड रस्ता ते विप्रो कंपनी, तांबेपुरा परिसरापर्यंत सुमारे २ कोटी रुपयांच्या सिमेंट कॉंक्रिटीकरणाच्या रस्त्याला मंजुरी मिळाली आहे. मात्र, सद्यस्थितीत या रस्त्याचे काम अर्धवट आहे. हा रस्ता लवकर पूर्ण करावा, अशी मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे.

मारवड रस्त्यापासून विप्रो कंपनीपर्यंतचा हा मार्ग वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. मात्र, अर्धवट रस्त्यामुळे उर्वरीत रस्त्यावर मोठ्या प्रमाणात धूळ उडते. लहान मुले व वृद्धांना दम्याचा तसेच श्वसनाच्या त्रासाचा सामना करावा लागत आहे. सकाळी साफसफाई केल्यानंतर अवघ्या तासाभरात घरातील फर्निचर, भांडी व कपड्यांवर धुळीचा थर साचतो, अशी ओरड गृहिणींमधून होत आहे. रस्त्यावर मोठ्या प्रमाणात धूळ उडत असल्याने समोरून येणारी वाहने दिसेनाशी होतात. त्यामुळे किरकोळ अपघातांचे प्रमाण वाढले आहे. रामवाडी येथील संतप्त रहिवाशांनी सांगितले, की " प्रशासनाने कागदावर कोट्यवधींचा निधी मंजूर केला असला तरी प्रत्यक्ष कामाला गती नाही. आम्हाला धुळीतच जगावे लागत आहे. किमान रस्ता पूर्ण होईपर्यंत तरी नियमित पाणी मारण्याची व्यवस्था करावी."



*अमळनेर : प्रभाग एकमधील अर्धवट असलेला रस्ता.*

### कामाचा तपशील

**कामाचे नाव :** प्रभाग क्र. १ मधील मारवड रस्ता ते विप्रो कंपनी (तांबेपुरा) रस्ता कॉंक्रिटीकरण.
**अंदाजित किंमत :** दोन कोटी रुपये.
**योजना :** नागरी स्थानिक स्वराज्य संस्था विशिष्ट नागरी सेवा व सुविधा योजना

# भुसावळच्या कुस्ती दंगलीत पवन शिंपीची दमदार कामगिरी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : जय हिंद व्यायामशाळेचा पहिलवान पवन प्रताप शिंपी याने भुसावळ येथील हाजी इकबाल व्यायामशाळेतर्फे नुकत्याच झालेल्या ठेक्याच्या भव्य कुस्ती स्पर्धेत उत्कृष्ट झुंज देत प्रेक्षकांची मने जिंकली. या दंगलीत त्याची लढत मालेगाव येथील नामांकित व अनुभवी पैलवान अमीर शेख याच्यासोबत झाली. सुरुवातीपासूनच दोन्ही पहिलवानांनी ताकद, चपळाई व डावपेचांचे शानदार प्रदर्शन करत रंगतदार कुस्ती लढवली. अखेरपर्यंत चुरशीची झुंज सुरू राहिल्याने ही कुस्ती बरोबरीत सुटली. दंगलीला उपस्थित कुस्तीप्रेमींनी दोन्ही पहिलवानांच्या कुस्तीचे कौतुक केले. पवन शिंपी याने नामचीन प्रतिस्पर्ध्याविरुद्ध दिलेली तगडी झुंज ही उल्लेखनीय ठरली. बरोबरी साधत त्याने सलामीची कुस्ती देत आपल्या तालुक्याचा मान उंचावला आहे. या यशाबद्दल पवन शिंपी याचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे. जय हिंद व्यायामशाळा परिवारासह कुस्तीप्रेमींनी त्याच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला.



***भुसावळ : कुस्तीप्रसंगी उपस्थित पवन पहिलवान व अमीर शेख व प्रताप शिंपी.***

# सहा पदार्थ जे पुन्हा गरम करून खाणे आरोग्यासाठी घातक

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आपल्या आहारात रोज आपण वेगवेगळे पदार्थ खात असतो. मात्र, असे काही पदार्थ आहेत, की जे पुन्हा गरम करून खाणे आरोग्यासाठी घातक आहेत. हे सहा पदार्थ कोणते ते जाणून घेऊया.

**भात :** भात पुन्हा गरम केल्यामुळे त्यातील बॅक्टेरिया वेगाने वाढतात आणि त्यातून विषारी घटक तयार होतात. त्यामुळे जेवणानंतर काही तासांतच तीव्र उलट्या आणि जुलाबाचा त्रास होऊ शकतो.
**मशरूम :** मशरूम पुन्हा गरम केल्याने त्यातील संयुगे विषारी बनतात, ज्याचा थेट परिणाम पोट आणि यकृतावर होतो. मशरूम शिजविल्यानंतर लगेच खावेत किंवा फ्रीजमध्ये ठेवून थंडच खावेत.
**पालक आणि पालेभाज्या :** पालकामध्ये नायट्रेट्स असतात. ते पुन्हा गरम केल्यावर त्याचे रूपांतर कॅन्सरला कारणीभूत ठरणाऱ्या घातक घटकांमध्ये होते. त्यामुळे शिजवलेला पालक कधीही पुन्हा गरम करू नका.
**अंडी :** अंडी थंड होऊन पुन्हा गरम केल्यास ती बॅक्टेरियासाठी पोषक जागा बनतात. यामुळे गंभीर विषबाधा होऊ शकते. अंडी नेहमी ताजी खाणेच फायदेशीर असते.
**बटाटे :** शिजवलेले बटाटे खोलीच्या तापमानाला ठेवल्यास त्यात 'बोट्युलिझम' नावाचे बॅक्टेरिया वाढतात. पुन्हा गरम केल्याने हे विषारी घटक मरत नाहीत, ज्यामुळे अर्धांगवायू होण्याचा धोका असतो.
**बीट :** बीट पुन्हा गरम केल्याने त्यातील नायट्रेट्सचे रूपांतर विषारी नायट्राइट्समध्ये होते. त्यामुळे रक्तातील ऑक्सिजनच्या प्रमाणात समस्या निर्माण होऊ शकते, ज्याचा सर्वाधिक धोका लहान मुलांना असतो.

# कर्करोग तपासणी शिबीराचा दीडशे महिलांनी घेतला लाभ

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील रोटरी क्लबतर्फे गणेश हॉस्पिटल येथे शुक्रवार, दि. ६ फेब्रुवारी रोजी मोफत कर्करोग तपासणी शिबीर घेण्यात आले. या शिबिराचा सुमारे दीडशे रूग्णांनी लाभ घेतला. सकाळी दहा ते सायंकाळी पाच या वेळात हे शिबीर घेण्यात आले होते.

नवसारी जिल्ह्यातील चिखली येथून सर्व प्रकारच्या कर्करोग निदानासाठी सुसज्ज असलेली मोबाईल व्हॅन शिबिरासाठी दाखल झाली होती. सुप्रसिद्ध स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. प्रसन्न जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबीर झाले. शिबिरात स्तनाची तपासणी, गर्भाशय कर्करोगासाठी पॅपस्मिअर तपासणी, स्तन कर्करोगासाठी मॅमोग्राफी तपासणी, स्व-स्तन तपासणीबाबत प्रत्यक्ष प्रशिक्षण व मार्गदर्शन करण्यात आले. ३५ ते ६० वयोगटातील महिलांचा सहभाग होता. धकाधकीच्या जीवनशैलीत महिलांचे आरोग्य अनेकदा दुर्लक्षित राहते. विशेषतः गर्भाशय व स्तन कर्करोग हे आजार सुरुवातीच्या टप्प्यात ओळखले गेले तर त्यावर यशस्वी उपचार शक्य असतात. मात्र, जागरूकतेचा अभाव तपासणीची भीती व आर्थिक अडचणींमुळे अनेक महिला तपासणीपासून दूर राहतात. ही बाब लक्षात घेऊन रोटरी क्लबने हा उपक्रम राबविला. क्लबतर्फे नियमित विविध आरोग्य शिबिरांचेही अयोजन केले जाते. रोटरी क्लबचे अध्यक्ष देवेंद्र कोठारी, सचिव आशिष चौधरी, डिस्ट्रिक्ट गव्हर्नर ज्ञानेश्वर शेवाळे, डिस्ट्रिक्ट प्रोजेक्ट चेअरमन प्रतिक जैन, मेडिकल कम्युनिटी डायरेक्टर्स डॉ. राहुल मुठे व डॉ. शरद बाविस्कर यांचे मार्गदर्शन लाभले. विजय पाटील, अजय रोडगे, दिनेश रेझा, महेश पाटील, किशोर लुल्ला, विजय माहेश्वरी, चेलाराम सैनानी, अभिजीत भांडारकर, कीर्ती कोठारी, पूनम कोचर, डॉ. अनिल वाणी आर्दीनी सहकार्य केले.

### अमळनेर रोटरी क्लबतर्फे आयोजन





***अमळनेर : मोफत कर्करोग तपासणी शिबिराप्रसंगी स्त्री रोगतज्ज्ञ डॉ. प्रसन्न जोशी, देवेंद्र कोठारी, आशिष चौधरी, ज्ञानेश्वर शेवाळे, प्रतिक जैन, किर्तीकुमार कोठारी आदी.***

# 'सैराट' फेम तानाजी गळगुंडेचा धक्कादायक खुलासा

## रिंकू राजगुरूबद्दल काय म्हणाला ?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

नागराज मंजुळे यांच्या 'सैराट'ने मराठी सिनेसृष्टीचा इतिहास बदलला. या सिनेमाने आर्ची- परशा दिलेच, पण त्यासोबत सल्या आणि बाळ्यासारखी पात्रंही प्रेक्षकांच्या काळजात घर करून गेली. आज रिंकू राजगुरूची ओळख केवळ सैराट चित्रपटातील आर्ची पर्यंत मर्यादित राहिलेली नाही. तिने ग्लॅमरच्या जगात स्वतःचे एक वेगळे साम्राज्य उभे केले आहे. मात्र, याच सिनेमातून घराघरात पोहोचलेला 'बाळ्या' म्हणजेच अभिनेता तानाजी गळगुंडेला आजही संघर्ष करावा लागत आहे. नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत तानाजीने आपल्या वाट्याला आलेल्या उपेक्षेचा आणि जवळच्याच लोकांनी केलेल्या फसवणुकीचा पाढा वाचला आहे. एका मुलाखतीत तानाजीने इंडस्ट्रीतील एक दाहक वास्तव मांडले. तो म्हणाला, "इंडस्ट्रीत मुख्य भूमिकेत असणाऱ्यांची आणि आमच्यासारख्या सहाय्यक कलाकारांची किंमत खूप वेगळी असते. रिंकूने स्वतःला खूप छान घडवले आणि तिची मार्केट व्हॅल्यूही मोठी आहे."
तानाजी पुढे म्हणाला, "रिंकूचा एक सिनेमा आणि माझे ३० सिनेमे बरोबर आहेत. तिला वर्षातून एखादाच चांगला सिनेमा केला तरी चालतो, पण मला माझे घर चालवण्यासाठी छोटे-मोठे मिळेल ते काम करत राहावे लागते."
तानाजीच्या या बोलण्यातून कलाविश्वातील विषमतेचं चित्र स्पष्टपणे समोर आले आहे.
'सैराट' गाजल्यानंतर तानाजीकडे प्रसिद्धीसोबतच चांगलं मानधनही आलं होते. एका सामान्य कुटुंबातून आलेल्या तानाजीला अचानक मिळालेल्या या पैशांचे नियोजन कसे करायचे, याचे अज्ञान होते. याच आर्थिक अज्ञानाचा फायदा त्याच्याच जवळच्या मित्रमंडळींनी घेतला. तानाजीने अत्यंत भावूक होऊन सांगितले की, " पैसे हातात आले की मित्र वाढतात, हे मला उशिरा कळले. कुणी व्यवसाय सुरू करायला पैसे मागितले, कुणी 'पैसे वाढवून देतो' असे आमिष दाखवले, तर कुणी घरगुती अडचणी सांगून उसने पैसे घेतले. मी मित्रांवर आंधळा विश्वास ठेवला आणि स्वतःकडे काहीही न ठेवता सर्व पैसे त्यांना देऊन टाकले." पैसे मिळताच त्या तथाकथित मित्रांनी तानाजीला ब्लॉक केले आणि त्याचे फोन उचलणंही बंद केले. आजही तानाजीला लोक 'बाळ्या' म्हणून ओळखतात, रस्त्यात गेल्यावर सेल्फी घेतात. पण या प्रसिद्धीच्या झगमगाटामागे पोटाची खळगी भरण्यासाठी सुरू असलेली ओढाताण केवळ त्यालाच माहीत आहे. जवळच्या लोकांकडून मिळालेल्या या धयाने तानाजी आता सावरण्याचा प्रयत्न करत असला, तरी विश्वासाला तडा गेल्याचं दुःख त्याच्या चेहऱ्यावर स्पष्ट जाणवत होते.



हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# दिन में डॉक्टरी और रात में यूपीएससी की तैयारी,
## पॉकेट नोट्स लेकर चलती थीं डॉ. अक्षिता, पहली बार में बन गईं आईएएस



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सक्सेस स्टोरी

यूपीएससी की तैयारी के लिए दिन में डॉक्टरी करते- करते भी पढ़ाई का समय निकाला। रात में तैयारी पर पूरा फोकस करने वाली डॉ. अक्षिता पहली बार में आईएएस बनी थीं। उन्होंने ऑल इंडिया रैंक-६९ के साथ सिविल सेवा परीक्षा पास की थी।

दिन में मरीजों का इलाज और रात में ऐसे सपने का पीछा करती थीं, जिसके लिए अनुशासन, त्याग, धैर्य और अटूट विश्वास की जरूरत थी। डॉ. अक्षिता की कहानी हिम्मत और सपनों को जीना सिखाती है। अस्पताल में डॉक्टरी करते-करते वह यूपीएससी की तैयारी के लिए कुछ समय अपने बचा लेती थीं। ब्रेक में भी जेब में नोट्स रखकर चलतीं और अपने पक्के इरादे के साथ आगे बढ़ती थीं। फिर एक दिन उनका सबसे खूबसूरत सपना पूरा हो गया जब उन्होंने अपने पहले प्रयास में यूपीएससी में ६९वीं रैंक हासिल की। इस सक्सेस स्टोरी में जानते हैं कि कैसे आईएएस अक्षिता ने दिखाया कि जब जुनून और लगन के साथ काम किया जाए तो चुनौतियों के बीच भी आगे बढ़ा जा सकता है।

### पंचकूला की हैं अक्षिता, इसलिए चुनी सिविल सर्विस

डॉ. अक्षिता गुप्ता हरियाणा के पंचकूला की रहने वाली हैं। उन्होंने यूपीएससी की तैयारी तब शुरू की थी, जब वह चंडीगढ़ मेडिकल कॉलेज और हॉस्पिटल में एमबीबीएस कर रही थीं। इस दौरान उन्हें एहसास हुआ कि वह क्लिनिकल प्रैक्टिस से हटकर मुद्दों को अलग नजरिए से देखना चाहती हैं।

### दिन में डॉक्टरी, रात में सपनों पर लक्ष्य

अपनी मुश्किल मेडिकल पढ़ाई के साथ-साथ सिविल सर्विसेज की तैयारी शुरू करने के लिए प्रेरित किया। मेडिकल इंटर्नशिप में अस्पताल की भागदौड़, मरीजों की जिम्मेदारी और शिफ्ट के बीच भी वह अपने लक्ष्य के प्रति डटी रहीं। दिन में वह डॉक्टरी करती थीं और रात में यूपीएससी की तैयारी करती थीं।

### अस्पताल के ब्रेक में काम आते थे पॉकेट नोट्स

अस्पताल में छोटे-छोटे ब्रेक में भी पढ़ाई पर ही ध्यान देती थीं। वह समय बचाने के लिए जरूरी पॉकेट नोट्स लेकर चलती थीं। किताबों के पन्ने भी अपनी जेब में रखतीं और जब भी उन्हें मौका मिलता तो तुरंत अध्ययन शुरू कर देती थीं। कई बार तो अक्षिता की शिफ्ट १२ से १४ घंटे तक की होती थी लेकिन थकान के बाद भी पढ़ाई नहीं छोड़ी।

### पहले ही प्रयास में बनी थीं अधिकारी

नौकरी छोड़े बिना, शारीरिक थकान और चुनौतियों के बीच राह कठिन जरूर थी लेकिन नामुमकिन नहीं। २०२० में उन्होंने अपने पहले ही प्रयास में ऑल इंडिया रैंक-६९ हासिल करके आईएएस बन गई थीं। आज वे पंजाब कैडर की आईएएस अधिकारी के रूप में देश सेवा कर रही हैं।

### मेडिकल बैकग्राउंड बना ताकत

डॉ. अक्षिता ने कभी अपने मेडिकल बैकग्राउंड को तैयारी में बाधा नहीं माना और उसे अपनी सबसे बड़ी ताकत समझकर आगे बढ़ीं। उन्होंने मेडिकल साइंस को ही अपना ऑप्शनल सब्जेक्ट चुना और अपने अनुभव को सही दिशा में शामिल करने के बारे में सोचा था। मरीजों की सेवा करते हुए उन्होंने समाज को करीब से समझा था।

# चिंताग्रस्त मन शांत कसे करावे?
## या सोप्या टिप्स फॉलो करा!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

चिंता म्हणजे केवळ विचार नव्हे, तर शारीरिक अवस्था चिंता वाटणे म्हणजे तुमची 'नर्व्हस सिस्टम' सतत सावध मोडवर असणे. तुम्हाला मन शांत करायचे असेल, तर तुमच्या मेंदूला सांगावे लागेल की " सध्या कोणताही धोका नाही." यासाठी काही सोप्या टिप्स फॉलो करा.

चिंता वाढली की, हृदयाचे ठोके वाढतात. ते कमी करण्यासाठी श्वास घेण्याची एक खास पद्धत वापरा. दोनवेळा नाकाने श्वास घ्या आणि एकदा तोंडातून सोडा. यामुळे शरीराला लगेच आराम मिळतो. आपल्या कानाच्या खालून जाणारी एक नस मनाला शांत करण्याचे काम करते. या भागाला हलका मसाज केल्यास किंवा तिथे लक्ष केंद्रित केल्यास चिंता कमी व्हायला मदत होते.

**डोळ्यांना विश्रांती द्या :** जेव्हा आपण तणावात असतो, तेव्हा आपली नजर एकाच गोष्टीवर खिळते. डोळ्यांना शांत ठेवल्यास आणि अधूनमधून लांबवर पाहिल्यास तणाव पातळी कमी होते.


**श्वास सोडण्यावर लक्ष द्या :** तुम्ही किती हवा आत घेता यापेक्षा ती किती संथपणे बाहेर सोडता हे महत्त्वाचे आहे. ताजी हवा घेणे आणि दीर्घ श्वास सोडणे मनासाठी 'रीसेट' बटणासारखे काम करते. जेव्हा खूप भीती किंवा अस्वस्थता वाटेल, तेव्हा थंड पाण्याचा वापर करा. चेहऱ्यावर थंड पाणी मारल्याने किंवा थंड तापमानामुळे मेंदूचे भीती केंद्र शांत होते.

# भारत- पाकिस्तान मॅचचा जाहिरातीचा दर धडकी भरवणारा

**सामना न झाल्यास प्रचंड नुकसान!**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सध्या टी- २० विश्वचषकाला सुरुवात झाल आहे. येत्या १५ फेब्रवारी रोजी भारत आणि पाकिस्तान यांच्यात सामना होणार आहे. मात्र, या सामन्याबाबत अद्यापतरी अनिश्चितताच आहे. त्यामुळे ब्रॉडकास्टर्सचे मोठे नुकसान होण्याची शक्यता आहे. येत्या १५ फेब्रुवारी रोजी भारत- पाकिस्तान यांच्यात सामना होणार की नाही ? याबाबत अजूनही अनिश्चितता आहे. पाकिस्तान क्रिकेट बोर्डाची इंटरनॅशनल क्रिकेट काऊन्सिलसोबत चर्चा चालू असल्याचे बोलले जात आहे. दरम्यान, भारत-पाकिस्तान सामना जगभरात कोट्यवधी लोक पाहतात. त्यामुळेच या सामन्यातील प्रत्येक जाहिरातीचा दरही तेवढाच जास्त असतो. प्रत्येक १० सेकंदांसाठी किती रुपये आकारले जातात? हा दर नेमका किती असतो ते जाणून घेऊ या.



भारत- पाकिस्तान सामना असेल तर जाहिरातीचा दर गगनाला भिडतो. २०२५ आणि २०२६मध्ये भारत-पाकिस्तान यांच्यात झालेल्या सामन्यांकडे पाहता प्रत्येक सामन्यात १० सेकंदाच्या जाहिरातीसाठी १४ लाख रुपये ते ५० लाख रुपयांपर्यंतचा दर असू शकतो. विश्वचषक, चॅम्पियन्स ट्रॉफी यासारख्या सामन्यांत भारत-पाकिस्तान सामना चालू असेल तर जाहिरातीचा दर जास्तच वाढतो. आशिया कप २०२५ मध्ये भारत- पाकिस्तान सामन्यादरम्यान प्रत्येक १० सेकंदाच्या जाहिरातीसाठी १४ ते १६ लाख रुपये दर आकारला होता.

### सामना न झाल्यास किती कोटींचे नुकसान होणार?

फक्त टीव्हीच नव्हे तर डिजिटल प्लॅटफॉर्म तसेच कनेक्ट टीव्ही देखील जाहिरातीसाठी महत्त्वाचे मंच आहेत. या मंचावरही जाहिरात द्यायची असेल तर प्रत्येक १० सेकंदासाठी २५ ते ३० लाख रुपये घेतले जातात. दरम्यान, येत्या १५ फेब्रुवारी रोजीचा भारत- पाकिस्तान सामना न झाल्यास ब्रॉडकास्टर्सचे मोठे नुकसान होऊ शकते.नुकसानीचाहा आकडा थेट २०० ते २५० कोटीच्या घरात जाऊ शकतो. त्यामुळे आता हा सामना होणार का? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

### १५ फेब्रुवारी रोजी मॅच किती वाजता होणार?

दरम्यान, भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामन्याबाबत अजूनही अनिश्चितताच आहे. मात्र, वेळा पत्रकाप्रमाणे हा सामना येत्या १५ फेब्रुवारी रोजी दुपारी दीड वाजता चालू होणार आहे. या दिवशी रविवार आहे. कोलंबो येथील आर प्रेमदासा स्टेडियममध्ये हा सामना खेळविला जाणार आहे.

# संकटे संपता संपेना, ना लस, ना खात्रीशीर उपचार
## निपाह व्हायरस किती धोकादायक, कसा होतो प्रसार?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



भारतात निपाह व्हायरसच्या नवीन प्रकरणांची पुष्टी होताच केवळ देशातच नव्हे, तर संपूर्ण आशियामध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे. हा तोच व्हायरस आहे ज्याचा मृत्यूदर ४० ते ७५ टक्क्यांपर्यंत असल्याचे सांगितले जाते. पश्चिम बंगालमध्ये याची लागण झालेली रुग्ण आढळताच अनेक आशियाई देशांनी तातडीने विमानतळांवर स्क्रीनिंग, आरोग्य तपासणी आणि प्रवाशांवर देखरेख कडक केली आहे.

निपाह व्हायरसची भीती अधिक असण्याचे कारण म्हणजे हा व्हायरस माणसांमध्ये पसरतो आणि अद्याप यावर कोणताही खात्रीशीर उपचार किंवा लस उपलब्ध नाही. याच कारणामुळे जागतिक आरोग्य संघटना देखील याला उच्च जोखीम असलेला आणि महामारी पसरवण्याची क्षमता असलेला व्हायरस मानते. आरोग्य अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार कोलकात्याजवळील एका खासगी रुग्णालयात निपाह व्हायरस संसर्गाची पुष्टी झाली आहे. यानंतर वेगाने 'कॉन्टॅक्ट ट्रेसिंग' सुरू करण्यात आले. सुमारे १०० लोकांना क्वारंटाइन करण्यात आले आहे, तर १८० हून अधिक लोकांची तपासणी पूर्ण झाली आहे. यापैकी २० जण 'हाय रिस्क' श्रेणीत आहेत. मात्र दिलासादायक बाब म्हणजे आतापर्यंत सर्वांचे रिपोर्ट नेगेटिव्ह आले आहेत. दोघांची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगण्यात येत आहे.

### निपाह व्हायरस आहे तरी काय?

निपाह व्हायरस हा एक 'झुनोटिक' आजार आहे. म्हणजेच तो प्राण्यांकडून माणसांमध्ये पसरतो. फळे खाणारी वटवाघूळ या व्हायरसचे नैसर्गिक वाहक मानले जातात. हा व्हायरस दूषित फळे किंवा अन्न खाल्याने, बाधित डुकरांच्या संपर्कात आल्याने किंवा संक्रमित व्यक्तीच्या संपर्कात आल्याने पसरू शकतो.

### निपाह व्हायरस किती धोकादायक?

निपाह व्हायरस इतर व्हायरसच्या तुलनेत खूपच भयानक आहे. यामध्ये मृत्यूदर ४० ते ७५ टक्क्यांपर्यंत असू शकतो. हा व्हायरस अधिक घातक ठरण्याचे मुख्य कारण म्हणजे तो थेट मेंदूवर हल्ला करतो. ज्यामुळे रुग्ण कोमात जाऊ शकतो. एकदा रुग्ण कोमात गेला, की त्याचा जीव वाचवणे कठीण होते. विशेष म्हणजे या व्हायरसवर अद्याप कोणतीही लस किंवा औषध उपलब्ध नसल्यामुळे काळजी घेणे हाच एकमेव उपाय आहे.

### निपाह व्हायरसची लक्षणे

१) ताप
२) डोकेदुखी
३) अंगदुखी
४) उलट्या
५) घसा खवखवणे
६) श्वास घेण्यास त्रास होणे
७) न्यूमोनिया
८) बेशुद्ध पडणे किंवा गोंधळलेली अवस्था
९) मेंदूला सूज येणे
१०) अनेकदा रुग्णांमध्ये सुरूवातीला कोणतीही लक्षणे दिसत नाहीत. ज्यामुळे संसर्गाचा धोका अधिक वाढतो.
११) काळजी घ्या
१२) बाहेरची कापलेली किंवा पक्ष्यांनी कुरतडलेली फळे खाणे टाळा.
१३) लक्षणे दिसल्यास त्वरित डॉक्टरांशी संपर्क साधा.
१४) संक्रमित रुग्णापासून सुरक्षित अंतर राखा आणि मास्कचा वापर करा.
१५) ज्या भागात व्हायरसचे रुग्ण आढळले आहेत त्या भागात जाणे टाळा.
१६) सध्या निपाह व्हायरसवर कोणतेही उपचार किंवा लस उपलब्ध नाही. उपचार केवळ लक्षणांच्या आधारावर आणि सपोर्टिव्ह केअरपर्यंत मर्यादित आहेत. याच कारणामुळे सरकार प्रतिबंध, स्क्रीनिंग आणि जागरूकतेवर जास्त भर देत आहे. भारतात निपाहची प्रकरणे समोर आल्यानंतर आशियाई देशांचे अलर्ट मोडवर येणे हेच दर्शविते, की हा व्हायरस किती धोकादायक आणि संवेदनशील मानला जातो. वेळेत घेतलेली खबरदारी हाच यापासून बचावाचा सर्वांत मोठा मार्ग आहे.

# आयुर्वेदानुसार 'शेवगा' सुपरफूड का आहे?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आयुर्वेदानुसार शेवगा सुपरफूड का आहे, याची अनेकांना माहिती नसेल. शेवगा हे आरोग्यासाठी चांगले असल्याचे तज्ज्ञ सांगतात. जाणून घेऊयात काय आहे महत्व.

### आयुर्वेदिक महत्त्व

आयुर्वेदात 'शिग्रु' नावाने ओळखला जाणारा शेवगा शरीरातील विषारी घटक (आम) काढून रक्त शुद्ध करतो आणि शरीराची सूज कमी करतो.

### पोषक तत्वांचा खजिना

शेवग्यामध्ये नैसर्गिक आयर्न, कॅल्शियम, पोटॅशियम, जीवनसत्व ए, सी, ई, आणि वनस्पती प्रथिने मुबलक प्रमाणात असतात.

### ऊर्जा आणि पचन

शेवग्याच्या नियमित सेवनाने शरीरातील थकवा दूर होऊन ऊर्जा स्थिर राहते आणि पचनक्रिया हलकी व सुधारित होते.

### हाडांचे आरोग्य

शेवग्याच्या शेंगा आणि पानांमधील पोषक घटक सांधेदुखी कमी करण्यास आणि हाडांना मजबूती देण्यास मदत करतात.

### त्वचेसाठी उपयुक्त

रक्ताच्या शुद्धीकरणामुळे त्वचा स्वच्छ आणि चमकदार होते. तसेच मुरुमांच्या समस्येवर शेवग्याच्या पानांचा लेप गुणकारी ठरतो.

### वापरण्याची पद्धत

शेवग्याच्या वाळलेल्या पानांचे चूर्ण किंवा ताजी पाने भाजी व सूपमध्ये वापरता येतात. चूर्ण कोमट पाण्यासोबत घेतल्यास अधिक फायदा होतो.



### वैज्ञानिक आधार

शेवग्यात आढळणारे 'क्वेरसेटिन' आणि 'बीटा-कॅरोटीन' पेशींचे रक्षण करून रोगप्रतिकारशक्ती संतुलित राखण्यास मदत करतात.

### सातत्य आवश्यक

शेवगा हे कोणतेही त्वरित समाधान नसून, शिस्तबद्ध आणि निरंतर सेवनानेच याचे दीर्घकालीन आयुर्वेदिक लाभ मिळतात.

### सुलभ पर्याय

तुम्ही शुद्ध शेवगा एक्स्ट्रॅक्ट कॅप्सूलचा (किंमत २७० रु.) वापर दैनंदिन आयुष्यात सोयीस्कर आरोग्यदायी पर्यायासाठी करू शकता.

# डायबिटीज असणाऱ्यांनी 'हे' पदार्थ खाऊच नये!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

डायबिटीज असणाऱ्यांनी कोणते पदार्थ खावेत व कोणते खाऊच नयेत याबाबत तज्ज्ञांनी सल्ला दिला आहे. त्यांनी एक लिस्टच सांगितली आहे, जाणून घेऊयात याविषयी.




मधुमेहामध्ये रक्तातील साखरेचे प्रमाण संतुलित ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे. केवळ गोड पदार्थच नाही, तर आपल्या रोजच्या आहारातील काही पदार्थ साखरेची पातळी वाढवू शकतात.

**साखर आणि गोड पेये** : सोडा, एनर्जी ड्रिंक्स, पॅकबंद फळांचा रस आणि फ्लेवर्ड चहा- कॉफी पिणे टाळा. या पेयांमध्ये साखरेचे प्रमाण खूप जास्त असते. ज्यामुळे रक्तातील साखर अचानक वाढू शकते.

**मैद्याचे पदार्थ** : पांढरा ब्रेड, पांढरा भात, पास्ता आणि मैद्यापासून बनवलेले बिस्किटे किंवा केक खाणे टाळावे. हे पदार्थ रक्तातील ग्लुकोजची पातळी झपाट्याने वाढवतात.

**स्टार्चयुक्त भाज्या** : बटाटा, मका आणि मटार यांसारख्या भाज्यांमध्ये स्टार्च आणि साखरेचे प्रमाण जास्त असते. मधुमेहींनी या भाज्यांचे सेवन मर्यादित ठेवावे किवा टाळावे.

**तळलेले प्रक्रिया केलेले अन्न** : भजी, वडे, चिप्स आणि इन्स्टंट नूडल्समध्ये सॅच्युरेटेड फॅट्स आणि ट्रान्स फॅट्स असतात. हे पदार्थ केवळ साखरेची पातळीच नाही, तर रक्तातील कोलेस्ट्रॉलही वाढवतात.

**फळ** : आंबा आणि चिकू यांसारखी अति गोड फळे मर्यादित खावीत. तसेच मनुका आणि खजूर यांसारखा सुका मेवा टाळलेला बरा, कारण त्यात नैसर्गिक साखरेचे प्रमाण खूप जास्त असते.

**काय खावे** : आहारात फायबरयुक्त पालेभाज्या, कमी साखर असलेली फळे (उदा. सफरचंद, पेरू) आणि संपूर्ण धान्य जसे की नाचणी, ज्वारी आणि ओट्स यांचा समावेश करावा.

लहान बदल, मोठा फायदा : प्रक्रिया केलेले पदार्थ टाळून नैसर्गिक आणि घरगुती अन्नाला प्राधान्य द्या. नियमित व्यायाम आणि योग्य आहार हीच मधुमेहावर नियंत्रण मिळवण्याची गुरुकिल्ली आहे.

शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम

सीमा हॅण्डलूम हॉउस पारोला रोड, धुळे




# ब्रह्मा, विष्णू आणि महेश एकत्रीत संगम !

## जाणून घ्या त्र्यंबकेश्वर ज्योतिर्लिंगाची अनोखी रचना

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

महाशिवरात्री हा केवळ उपवास किंवा धार्मिक विधींचा दिवस नाही. प्रत्येकाच्या अंतःकरणात नित्य वास करणाऱ्या 'शिव' तत्त्वाची आत्मचैतन्याची जाणीव जागृत करण्याचा पवित्र काल आहे. पुराणांनुसार, या काळात शिवाचे मनोभावे घेतलेले दर्शन मनातील विकार दूर करून आत्म्याला शुद्ध करते. भारतातील १२ ज्योतिर्लिंग मंदिरांपैकी ३ ज्योतिर्लिंगांची मंदिरे महाराष्ट्रात आहेत. यातील नाशिकमधील त्र्यंबकेश्वर ज्योतिर्लिंग मंदिराविषयी जाणून घेऊया.

### नानासाहेब पेशवांनी केले मंदिराचे पुनर्निर्माण

"त्र्यंबकेश्वर ज्योतिर्लिंग" हे मंदिर नाशिक शहरापासून २८ किमी अंतरावर सह्याद्री पर्वताच्या पायथ्याशी वसलेल्या त्र्यंबकेश्वर या गावात स्थित आहे. सध्याचे मंदिर तिसरे पेशवे बालाजी अर्थात नानासाहेब पेशवे यांनी जुन्या मंदिराच्या जागेवर बांधले आहे. या मंदिराच्या बांधकामाची सुरुवात १७५५ मध्ये झाली. १७८६ मध्ये मंदिराचे बांधकाम पूर्ण झाले. जुन्या मंदिराच्या जागीच नानासाहेब पेशवे यांनी या मंदिराचे पुनर्निर्माण केले. त्र्यंबकेश्वर मंदिराचे व्यवस्थापन त्र्यंबकेश्वर मंदिर ट्रस्टकडून केले जाते.

### शिवलिंगाची वास्तविक रचना इतर ११ ज्योतिर्लिंगांपेक्षा वेगळी

त्र्यंबकेश्वर शिवलिंगाची वास्तविक रचना इतर ११



ज्योतिर्लिंगांपेक्षा वेगळी आहे. येथील शिवपिंडीमध्ये अंगठ्याच्या आकाराच्या तीन कपार आहेत. यामध्ये त्रिमूर्ती म्हणजेच "ब्रह्मा-विष्णू-महेश" विद्यमान आहेत. गोदावरी नदीचा उगमही येथेच झाला आहे. या शिवलिंगातून गोदावरीचा प्रवाह सातत्याने सुरू असतो. या स्वरूपाचे हे जगातील एकमेव शिवलिंग आहे. येथेच संत निवृत्तीनाथ महाराज यांचे समाधी मंदिर आहे. मंदिर प्रांगणाच्या जवळच कुशावर्त तीर्थ आहे. येथील कुशावर्तात स्नान करण्यासाठी भाविक भारतभरातून हजेरी लावतात. त्याचबरोबर अनेक धार्मिक संस्था येथे कार्यरत आहेत. वेदशाळा, संस्कृत पाठशाळा, कीर्तन पाठशाळा, प्रवचन संस्था येथे आहेत. स्थानिक माहितीनुसार, ज्योतिर्लिंगावर "त्रिकाल पूजा" केली जाते, जी ३५० वर्षांपासून सुरू आहे, जी द्वादश ज्योतिर्लिंगांपैकी केवळ त्र्यंबकेश्वर मंदिरातच होते.

### ब्रह्मगिरी पर्वताला पौराणिक, ऐतिहासिक आणि भौगोलिक महत्त्व

ब्रह्मगिरी पर्वताला पौराणिक, ऐतिहासिक आणि भौगोलिक महत्त्व आहे. पौराणिक संदर्भानुसार ब्रह्मदेवांनी श्री महादेवांना प्रसन्न करण्यासाठी याच पर्वतावर तप केले. या पर्वतावर एके काळी गौतम ऋषींचा आश्रम होता. गोहत्या पातकातून मुक्तता मिळावी म्हणून त्यांनी कठोर तपश्चर्या केली आणि महादेवांना प्रसन्न केले. गौतम ऋषींच्या विनंतीवरून महादेव इथे त्रिमूर्ती होऊन ज्योतिर्लिंग स्वरूपात विराजमान झाले. तेव्हापासून हे स्थान त्र्यंबकेश्वर म्हणून ओळखले जाऊ लागले. भगवान शंकरांनी या ठिकाणी गुडघ्यावर बसून कातळावर जटा आपटल्या आणि गंगेचा इथे उगम झाला, अशी आख्यायिका आहे. त्यामुळे त्र्यंबकेश्वरला ब्रह्मगिरीवर शंकराच्या जटा पाहण्यासाठी आवर्जून भाविक येत असतात.

### महाशिवरात्रीला पंचमुखी मुकुट प्रमुख आकर्षण

या मंदिरात महाशिवरात्रीचा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. प्रत्येक महाशिवरात्रीला भाविक भक्त येथे अलोट गर्दी करतात. या उत्सवात त्र्यंबकेश्वर महाराजांचा पंचमुखी सोन्याचा मुखवटा पालखीमध्ये बसवून फिरवला जातो. हा मुकुट म्हणजे या उत्सवाचे प्रमुख आकर्षणच असते. पालखीमध्ये बसवून फिरवून झाल्यानंतर कुशावर्त तीर्थ येथे घाटावर स्नान केले जाते व त्यानंतर मुखवटा परत मंदिरात आणला जातो.



# भारद्वाज पक्षी शुभ का मानला जातो?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारद्वाज पक्षी भारतीय परंपरेत, विशेषतः महाराष्ट्र व दक्षिण भारतात अत्यंत शुभ व मंगल प्रतीक मानला जातो. भारद्वाज पक्षी दिसणे, घराजवळ येणे किंवा घरटे बांधणे हे अनेक शुभ संकेत मानले जातात. भारद्वाज हे वैदिक काळातील महान ऋषी होते. ते विद्या, तपस्या, संयम आणि सद्बुद्धीचे प्रतीक होते. या ऋषींच्या नावावरूनच भारद्वाज पक्ष्याचे नाव पडले.

भारद्वाज पक्ष्याला देवांचा संदेशवाहक मानले जाते. हा पक्षी दिसणे म्हणजे देवकृपा, शुभ वार्ता किंवा सकारात्मक बदल येण्याचा संकेत समजला जातो. घराजवळ घरटे बांधणे- घरात सुख-शांती व स्थैर्य नांदते, सकाळी भारद्वाज पक्षी दिसणे दिवस शुभ जाण्याचा संकेत, प्रवास किंवा शुभकार्याच्या वेळी दिसणे, कार्य यशस्वी होईल अशी भावना. भारद्वाज पक्षी स्वच्छ, शांत आणि सकारात्मक वातावरणातच राहतो, त्यामुळे ज्या घरात हा पक्षी येतो, तेथे नकारात्मक ऊर्जा कमी असल्याचे मानले जाते. तो घरटे बांधत असेल, तर त्या वास्तूमध्ये स्थिरता, सुरक्षितता व समाधान असते, असा विश्वास आहे. शकुनशास्त्रात भारद्वाज पक्ष्याचा आवाज ऐकू येणे किंवा दर्शन होणे हे शुभ शकुन मानले जाते. हा पक्षी कीटक, अळ्या व हानिकारक जीव खातो, त्यामुळे शेतीसाठी उपयुक्त ठरतो. स्वच्छ परिसर, कमी प्रदूषण आणि सुरक्षित वातावरणातच तो वास्तव्यास असतो, त्यामुळे पर्यावरण संतुलनाचे लक्षण शांतता, संयम, बुद्धिमत्ता, निसर्गाशी सुसंवाद, स्थिर व संतुलित जीवन म्हणूनच तो केवळ पक्षी न राहता, सकारात्मकतेचे प्रतीक बनला आहे.

# महाराष्ट्रातील 'या' मंदिरात आहे भविष्य सांगणारा रहस्यमयी दगड





**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतात अनेक मंदिरे आहेत. त्यापैकीच एक म्हणजे महाराष्ट्रातील तुळजा भवानी मंदिर. या मंदिराविषयी अनेक मान्यता आहे.

### साडेतीन शक्तिपीठांपैकी एक

तुळजाभवानी मंदिर हे महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठांपैकी एक मानले जाते. महाराष्ट्रात या देवीला विशेष महत्त्व आहे.

### छत्रपती शिवाजी

महाराजांची कुलदेवता तुळजाभवानी ही छत्रपती शिवाजी महाराजांची कुलदेवता होती. मान्यतेनुसार देवीने शिवाजी महाराजांना तलवार दिली होती.

### कुठे आहे मंदिर

हे मंदिर दंडकारण्य परिसरातील यमुनांचल पर्वतावर स्थित आहे. येथे असलेली देवीची मूर्ती स्वयंभू असल्याचे मानले जाते.

### वर्षातून तीन वेळा फिरवली जाते मूर्ती

या मंदिरातील देवीची मूर्ती कायमस्वरूपी स्थिर नसून वर्षातून तीन वेळा मंदिर परिसरात फिरवली जाते, हे याचे खास वैशिष्ट्य आहे.

### मंदिराची रचना

मंदिराची रचना हेमाडपंथी शैलीची आहे. येथे कल्लोल तीर्थ आणि गोमुख तीर्थ असून, भाविक याठिकाणी स्नान करतात.

### रहस्यमयी चिंतामणी दगड

तुळजाभवानी मंदिराशी संबंधित चिंतामणी दगड अत्यंत रहस्यमय मानला जातो. हा दगड मंदिरात नसला तरी त्याबाबत अनेक मान्यता आहेत.

### दगड देतो संकेत

मान्यतेनुसार, दगडावर नाणे ठेवून इच्छा मागितल्यावर तो उजवीकडे फिरला तर इच्छा पूर्ण, आणि डावीकडे फिरला तर अपूर्ण राहते अशी मान्यता आहे.

# वाशीमचे जागीरदार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

महाराष्ट्राच्या विदर्भ भूमीत वसलेले एक असे ठिकाण, जेथे साक्षात तिरुपती बालाजींचा आशीर्वाद कायम असतो. आपण बोलत आहोत वाशीम शहराच्या गौरवशाली आणि प्राचीन श्री बालाजी मंदिराबद्दल.

दक्षिण भारतात तिरुपती बालाजींना 'टेकड्यांचा साहूकार' म्हणतात, पण आपल्या वाशीमच्या या मंदिराला 'वाशीमचा जागीरदार' म्हणून ओळखले जाते.

वाशिम जिल्ह्याचे पूर्वीचे नाव वत्सगुल्म असे होते. वाशीम शहर वाकाटक राज्याची राजधानी होती. वाकाटक राज्यांनी तिसऱ्या शतकापासून सहाव्या शतकापर्यंत राज्य केले. सदर राज्य हे मध्य प्रदेशापासून बेरार आंध्र प्रदेशपर्यंत होते. विन्ध्ये-शक्ती हा प्रथम वाकाटकचा राजा होता. सर्वसेन या राजाने वत्सगुल्म (वाशिम) ला राजधानी घोषित केले होते. त्यांचा हरिविजय व गाथासप्तषदी हे दोन ग्रंथ प्रसिद्ध आहेत. अजिंठा येथील लेण्यांना वाकाटक राज्यांनीच प्रोत्साहन दिल्याचे दाखले आहेत.

अडीचशे वर्षांपूर्वी 'वत्सगुल्म' म्हणजे आताच्या 'वाशीम' नगरीत एका ठिकाणी खोदकाम करताना काही मूर्ती सापडल्या. ही बातमी कळताच त्यावेळचे नबाब हशमत जंग बहादूर आणि स्थानिक देशमुख जमीनदार लोकांनी त्या ठिकाणी भेट देऊन जमीन आणखी खणायला सांगितली. त्यानंतर आतून हल्लीची बालाजींची विष्णू मूर्ती, लक्ष्मी, गणेश, शारदा वगैरे मूर्ती निघाल्या. त्या मंडळींनी वाजत-गाजत हनुमानजींच्या पारावर सर्व मूर्ती आणल्या. पुढे त्या मूर्ती हल्लीच्या मोठ्या मंदिरासमोर एक छोटे घर बांधून ठेवल्या. त्याकाळी वत्सगुल्म भागावर तिघांची सत्ता होती. पूर्वेकडील भाग निजामाच्या ताब्यात, मधला भाग पेशव्यांच्या ताब्यात तर पश्चिमेकडील भाग नागपूरकर भोसले यांच्या ताब्यात होता. परंतु मूर्ती सापडण्याची घटना पश्चिमेकडील म्हणजे नागपूरकर भोसल्यांच्या भागात घडली होती. त्यावेळी नागपूर येथे सेनासाहेब सुभा जानोजी भोसले होते. बंगालची खंडणी न मिळाल्यामुळे ती वसूल करण्याकरिता पहिले रघुजी भोसले यांच्या कारकिर्दीतील अत्यंत निष्ठावान आणि शूर सरदार भवानीपंत काळू हे बंगालच्या स्वारीवर निघाले होते. यापूर्वी भोसल्यांनी बंगालवर अनेक स्वाऱ्या केल्या होत्या. परंतु त्यांना खंडणी वसूल करता आली नव्हती.

वत्सगुल्म येथे भोसलेंच्या भागात मुर्त्या सापडल्याची वार्ता भवानीपंत काळू यांना कळताच ते लष्करासह वत्सगुल्म येथे आले. देवतांच्या मूर्ती पाहून त्यांना खूप आनंद झाला. त्यांनी विष्णू मूर्तीला असा संकल्प केला, की 'जर मी बंगालच्या स्वारीत यशस्वी झालो तर तुझे भव्य देवालय येथेच वत्सगुल्म नगरीत बांधीन!'

### नंतर ते तत्काळ बंगालच्या स्वारीला निघून गेले

बंगालच्या स्वारीला ते बालाजीच्या कृपेने यशस्वी झाले. स्वारीच्या वेळी भवानीपंत काळू यांच्याकडे 'दिवाण व सेनापती' हा कार्यभार होता. भवानीपंत हे कसलेले योद्धा आहेत, याची खात्री सेनासाहेब यांना होती. म्हणूनच ते भोसल्यांच्या फौजेचे मुख्य सेनापती होते. बंगालच्या स्वारीवरून परत आल्यावर वत्सगुल्मास घडलेली सर्व हकिकत व बंगालमध्ये मिळालेली सर्व संपत्ती दरबारी दिल्यानंतर त्यांनी वत्सगुल्म नगरीत श्री विष्णूच्या मूर्तीस केलेला संकल्प सेनासाहेबास कथन केला. संकल्पाप्रमाणे वाशीम शहरात श्री बालाजीचे भव्य मंदिर व त्याच्याच बाजूला असलेला 'देव तलाव' भवानीपंतांनी बांधला. त्यानंतर देवालयाच्या बांधकामास ६ ऑगस्ट १७७८ ला सुरूवात झाली. देवालयाचे गर्भगृह व दगडी सभामंडप बांधून झाल्यावर मंदिरात श्री बालाजी व सापडलेल्या इतर सर्व मूर्तींची प्राणप्रतिष्ठा मोठ्या समारंभपूर्वक भवानीपंत काळू यांनी श्रावण वद्य १० शके १७०५ इंग्रजी दिनांक २२ ऑगस्ट १७८३ रोजी शुक्रवारला केली. श्रींची प्राणप्रतिष्ठा करून त्यांनी नित्य पूजा अर्चा, आरती करण्यासाठी नोकर वर्ग नेमला.

मंदिरातील गर्भगृहात बालाजीच्या मूर्तीसमोरील भिंतीवर वरच्या बाजूला एक कोनाडावजा खिडकी आहे. मंदिर हिंदू परंपरेनुसार पूर्वाभिमुख असले तरी पश्चिम-पूर्व रेषेशी उत्तरेच्या दिशेने विशिष्ट कोनात मध्यरेषा निश्चित करून मंदिराचे बांधकाम करण्यात आलेले आहे. या विशिष्ट वास्तुशास्त्रीय रचनेमुळे सूर्याने उत्तरायणात प्रवेश केल्यापासून ते दक्षिणायन सुरू होईपर्यंत म्हणजे २१ डिसेंबर ते २२ जून या काळात बालाजीच्या मूर्तीवर सूर्यकिरणे पडतात. भवानीपंत काळू यांना मिळालेले यश हे उत्तरायण काळातच मिळाले होते. उत्तरायण सुरू होताच ते नागपूर येथून निघाले आणि उत्तरायणाच्या उत्तरार्धात कटक प्रांतात पोहोचले. फारसे युद्ध किंवा रक्तपात न होता दक्षिणायन सुरू होण्यापूर्वीच तह होऊन त्यांना अकल्पित यश प्राप्त झाले. आपल्या काळातील एक संस्मरणीय कालखंड स्मरणात रहावा म्हणून त्यांनी अशी वास्तुरचना करून घेतली. श्री बालाजी देवालय व देव तलावाचे बांधकाम पंचवीस वर्षे अविरत सुरू होते. या सर्व बांधकामासाठी श्रीमंत भवानीपंत काळू यांनी स्वतःच्या खासगी तिजोरीतून खर्च केला. बांधकामास त्यावेळी दहा लाख रुपये खर्च लागला. पुढे काही काळानंतर त्यांना जहागिरी मिळाली व त्यातून श्री बालाजी संस्थानचा कारभार सुरू झाला.

# पत्नीला वामांगी का म्हणतात?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

शास्त्रात पत्नीला वामांगी म्हणजेच डाव्या अंगाची अधिकारी म्हणतात. त्यामुळे पुरुषाच्या शरीराची डावी बाजू स्त्रीची मानली जाते. याचे कारण असे, की भगवान शिव यांच्या डाव्या अंगातून स्त्रीची उत्पत्ती झाली आहे, जी शिव यांच्या अर्धनारीश्वर शरीराचे प्रतीक आहे. हस्तरेषाशास्त्राच्या पुस्तकांमध्ये याच कारणांमुळे पुरुषाच्या उजव्या हाताने पुरुषाची स्थिती आणि डाव्या हाताने स्त्रीची स्थिती पाहण्यास सांगितले आहे. स्त्रीने आशीर्वाद घेताना आणि भोजनाच्या वेळी पतीच्या डाव्या बाजूला असावे, असे शास्त्रात सांगितले आहे. यामुळे शुभ परिणाम मिळतात.



वामांगी असूनही काही कामांमध्ये स्त्रीला उजव्या बाजूला राहण्यास शास्त्र सांगते. कन्यादान, विवाह, यज्ञकर्म, जातकर्म, नामकरण आणि अन्नदानाच्या वेळी पत्नीने पतीच्या उजव्या बाजूला बसावे, असे शास्त्रात सांगितले आहे. पत्नी पतीच्या उजवीकडे किंवा डावीकडे बसते या श्रद्धेमागील तर्क असा आहे, की ज्या कृती सांसारिक असतात त्यामध्ये पत्नी पतीच्या डाव्या बाजूला बसते. कारण हे कर्म स्त्रीभिमुख कर्म मानले जाते. यज्ञ, कन्यादान, विवाह ही सर्व कामे अतींद्रिय मानली जातात आणि ती पुरुषप्रधान मानली जातात. म्हणून या कृतींमध्ये पत्नीच्या उजव्या बाजूला बसण्याचे नियम आहेत.

तुम्हाला माहीत आहे का?

सनातन धर्मात पत्नीला पतीची वामांगी म्हणजेच पतीच्या शरीराची डावी बाजू असे म्हटले जाते. याशिवाय पत्नीला पतीची अर्धांगिनी असेही म्हटले जाते. म्हणजे पत्नी ही पतीच्या शरीराचा अर्धा भाग असते. दोन्ही शब्दांचे सार म्हणजे पती पत्नीशिवाय अपूर्ण आहे. पत्नी पतीचे जीवन पूर्ण करते, त्याला आनंद देते, त्याच्या कुटुंबाची काळजी घेते आणि त्याला हवा तो सर्व आनंद देते. समाज कोणताही असो, लोक कितीही आधुनिक असोत, पण नात्याचे स्वरूप प्रेम आणि परस्पर समंजसपणाने बनलेले पती-पत्नीसारखेच राहतात. प्रसिद्ध हिंदू धर्मग्रंथ महाभारतात पती-पत्नीच्या महत्त्वाच्या नातेसंबंधाबद्दल बरेच काही सांगितले गेले आहे. भीष्म पितामह म्हणाले होते, की पत्नीने नेहमी आनंदी राहावे. कारण तिच्या वंशाची वाढ होते, ती घराची लक्ष्मी आहे. लक्ष्मी प्रसन्न झाली तरच घरात सुख-समृद्धी येते. याशिवाय अनेक धार्मिक ग्रंथांमध्ये पत्नीचे गुण सविस्तरपणे सांगितले आहेत.

गरुड पुराणात सांगितलेल्या पत्नीच्या काही गुणांची माहिती दिली आहे.

सा भार्या या गृहे दक्षा सा भार्या या प्रियंवदा।
सा भार्या या पतिप्राणा सा भार्या या पतिव्रता।।

गरुड पुराणात पत्नीचे गुण समजून घेण्यासाठी हा एक श्लोक आढळतो. तो म्हणजे जी पत्नी गृहकार्यात निपुण आहे, जी प्रियवादिनी आहे, जिचा पती तिचा जीव आहे आणि जो पती आहे, ती खरी पत्नी होय. सद्गुणी पत्नी, जी घरातील कामात तरबेज असते. घरातील कामे सांभाळणारी, घरातील सदस्यांचा आदर करणारी, वडीलधाऱ्यांची आणि लहानांची काळजी घेणारी पत्नी होय. जी पत्नी घरातील सर्व कामे जसे- स्वयंपाक करणे, साफसफाई करणे, घराची सजावट करणे, कपडे आणि भांडी साफ करणे इत्यादी करते. गरूड पुराणानुसार कमी साधनातही घर चांगले सांभाळणारी पत्नी सद्गुणी म्हटली जाते, अशी पत्नी तिच्या पतीला नेहमीच प्रिय असते. 'प्रियवदिनी' म्हणजे गोड बोलणारी पत्नी, आजच्या युगात जिथे स्वतंत्र स्वभावाच्या आणि पटकन बोलणाऱ्या बायकाही आहेत. ज्यांना कोणत्या वेळी कोणाशी कसे बोलावे हेच कळत नाही, म्हणून गरुड पुराणात दिलेल्या सूचनेनुसार नवऱ्याशी नेहमी संयमी भाषेत बोलते, हळू बोलते आणि प्रेमाने बोलते तिलाच एक सद्गुणी पत्नी म्हटले आहे. पत्नी जेव्हा अशा प्रकारे बोलते तेव्हा पती सुद्धा तिचे बोलणे लक्षपूर्वक ऐकतो, आणि तिच्या इच्छा पूर्ण करण्याचा प्रयत्न करतो.

परंतु केवळ पतीच नाही तर घरातील इतर सर्व सदस्य किंवा कुटुंबाशी संयमित बोलते ती सद्गुणी पत्नी असते. ज्या घरात अशी गुणी स्त्री असेल त्या घरात कधीही कलह होत नाहीत आणि दुर्भाग्य राहत नसते. 'पतिपरायण' म्हणजे जी पत्नी आपल्या पतीचे शब्दाचे पालन करते ती देखील गरुड पुराणानुसार सद्गुणी पत्नी असते. जी पत्नी आपल्या पतीला सर्वस्व मानते, देवता मानते आणि आपल्या पतीबद्दल कधीही वाईट विचार करत नाही, ती पत्नी सद्गुणी असते. लग्नानंतर फक्त स्त्री म्हणून नाही, तर पुरुषाची बायको बनूनच नवीन घरात प्रवेश करते. तिला त्या नव्या घराची सूनही म्हणतात. तिचे त्या घरातील लोकांशी आणि संस्कारांशी घट्ट नाते बनते. त्यामुळे लग्नानंतर नवीन घरच्या लोकांशी संबंधित चालीरीती स्वीकारणे ही स्त्रीची जबाबदारी असते. याशिवाय पत्नीला एक विशेष धर्म पाळावा लागतो. लग्नानंतर तिचा पहिला धर्म म्हणजे पती आणि कुटुंबाच्या हिताचा विचार करणे आणि पती किंवा कुटुंबाचे नुकसान होईल, असे कोणतेही काम न करणे.




(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)